<u>प्रेस नोट दिनांक ०३/०७/२०१८</u>

## मा. न्यायालयात खोटया कागदपत्राद्वारे आरोपींना जामीन रहाणारा व मा. न्यायालयाची फसवणुक करणाऱ्या, सात महिन्यापासून फरार असलेल्या आरोपीस युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहरने केली अटक

मा. न्यायालय, शिवाजीनगर, पुणे येथे वेगवेगळया न्यायालयात अटकेत असलेल्या आरोपीस जामीनासाठी खोटी कागदपत्रे सादर करून मोठया प्रमाणात पैसे घेवून आरोपींचा जामीन मंजूर करणेसाठी जामीनदार म्हणून उभा रहात असलेला आरोपी नामे विनोद उर्फ कल्याण झुआरीलाल कालोसिया, रा. गणेश नगर, बोपखेल, पुणे याचे विरुध्द शिवाजी नगर, पो.स्टे.गु.र.नं. ४०५/२०१७ भा.द.वि.कलम ४२०,४६८,४७१,१९८,१९९,२०० अन्वये गुन्हा दाखल होता.

दाखल गुन्हयातील आरोपी हा मागील सात महिन्यापासून फरार होता व तो शिवाजीनगर रेल्वेस्टॅंड जवळ आले असल्याची खात्रीशीर बातमी **पो.ना. इरफान मोमीन व श्रीकांत वाघवले** यांना मिळाल्याने, सदर बातमीचा आशय श्री नितीन भोसले-पाटील,वरीष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा,युनिट-१ पुणे शहर यांना कळविले असता, त्यांनी सदर पाहीजे आरोपीस तात्काळ ताब्यात घेणेकामी योग्य ते मार्गदर्शन करुन, कारवाई करण्याचे आदेश दिले असता युनिट १ चे स्टाफसह सदर आरोपीस सापळा रचून ताब्यात घेण्यात आले आहे. त्यास विश्वासात घेवून तपास केला असता तो ज्या आरोपींना मा. न्यायालयात जामीनदार मिळत नाही, त्या आरोपींसाठी त्यांचेकडून मोठया प्रमाणात पैसे घेवून खोटे प्रतिज्ञापत्र व कागदपत्रे सादर करून व राशन कार्डवर हेराफेरी करून तो मा. न्यायालयात जामीनदार म्हणून हजर रहात होता व आरोपींना जामीन मिळवून देत होता. सदरची फसवणूकीची बाब ही मा. न्यायालयाच्या नजरेसमोर आलेनंतर सदर आरोपींवर गुन्हा दाखल करणेसाठी मा. न्यायालयाने शिवाजीनगर पोलीस स्टेशनला आदेशीत केले होते. त्याप्रमाणे गुन्हा दाखल केलेपासून सदरचा आरोपी हा फरार होता व त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, पोलीस उप-निरीक्षक, हर्षल कदम, दिनेश पाटील, व पोलीस कर्मचारी इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, रिजवान जिनेडी, तुषार खडके, सचिन जाधव, सुधाकर माने, इम्रान शेख, सुभाष पिंगळे, प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, गजानन सोनुने, प्रशांत गायकवाड, **स.पो.फौज. राजू पवार,** विजेसिंग वसावे, अशोक माने, तुषार माळवदकर, यांनी केली आहे.